# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**

**Case No: CGRF /AZ /U / 106 / 2008 / 27/**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer**
**O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Quazi Ahmed Moinuddin,S/o Quazi Gulam Azimuddin,Consumer(Quazi Ahmed Riyazudin Occupant) HouseNo.01.15.36, Buddilane, Aurangabad. ( Consumer No. 490010785542)

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Quazi Ahmed Moinuddin, S/o Quazi Gulam Azimuddin,Consumer (Quazi Ahmed Riyazudin Occupant) HouseNo.01.15.36, Buddilane, Aurangabad.

You are requested to submit your parawise reply on the grievance
within 15 days from the date of this letter

**The hearing of the grievance is fixed on date 03.06.2008 at**
**11.30 Hrs.**

**Encl As above**.
Shri Quazi Ahmed Moinu S/o Quazi Gulam Azimuddin,Co
(Quazi Ahmed Riyazudin Occup
HouseNo.01.15.36, Buddilane,Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/अेयुआर/यु/१०६/२००८/२७**
**तक्रार दाखल दिनांक ;- २०/०५/२००८**
**निकाल दिनांक ;- १९/०७/२००८**

**श्री काझी अहेमद मोईनुद्दिन**
**घर नंबर ०१/१५/३६, बुढ्ढिलाईन,**
**औरंगाबाद.**

**अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शहर मंडळ, औरंगाबाद.**

विषय ;- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल विनियम २००६) च्या अंतर्गत गा-हाणे.

१) अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची-अ'मध्ये, महाराष्ट्र. विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल)विनियम २००६च्या नियम ६.१०अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २०/०५/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०३/०६/२००८ रोजी ठेवण्यात आली.

२) ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

अर्जदाराने वाणीज्य वापरासाठी (मंगल कार्यालय) वीज वितरण कंपनीकडून वीज जोडणी घेतली आहे व त्याचा ग्राहक क्रमांक ४९००१०७८५५४२ असा आहे. अर्जदाराने एप्रिल २००७ पर्यंत वीज बिल भरणा केलेला आहे. त्यांना (२२/०७/०७ ते २२/०८/२००७) या काळासाठी २०६५ युनिट वापराचे रूपये १३३००/- चे बिल देण्यात आले.त्यानंतर २२/०८/२००७ ते २२/०९/२००७ कालावधीचे ५०४१ युनिट वापराचे व रु.४५२८०/- चे वीज बिल देण्यात आले. त्यानंतर त्यांना नोव्हेबर २००७ ते मार्च २००८ या काळात १३३६ यूनिट चे सरासरीवर आधारीत वीज बिल देण्यात आले. महावितरण कंपनीतर्फे देण्यात आलेली ही वीज बिले मान्य नसल्यामुळे व त्यांच्या तक्रारीची दखल न घेतली गेल्यामुळे त्यांनी मंचात तक्रार दाखल केली असून महावितरण कंपनीला सुधारीत वीज बिल देण्याबाबतचे आदेश देण्याची विनंती केली आहे.

३) दिनांक ०३/०६/२००८ रोजी ग्राहक श्री काझी अहेमद रियाजुद्दिन व नोडल अधिकारी श्री एस. जी. पवार उपस्थित होते. नोडल अधिका-यानी संबंधीत उप-विभागाकडून तपशील न मिळाल्यामुळे सुनावणीची तारीख वाढवण्याची विनंती केली. मंचाने विनंती मान्य करून सुनावणीची पुढील तारीख १०/०६/२००८ अशी ठेवली.

४) दिनांक १०/०६/२००८ रोजी ग्राहक श्री काझी अहेमद रियाजुद्दिन व नोडल अधिकारी श्री एस. जी. पवार उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जवाब दाखल केला त्यासोबत त्यांनी अर्जदाराचे सि.पी.एल. मीटर बदली अहवाल,व बिल रिव्हीजन इत्यादी कागदपत्रे दाखल केली. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराचे बिल दूरूस्त करण्यात आल्याचे सांगत सुधारीत बिलात २४६७५/- रूपयाचे क्रेडीट देण्यात आल्याचे म्हटले आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीनुसार त्याचा मीटर वरील नोंदीबाबत तक्रार असल्यामुळे नोडल अधिकारी यांना ते मीटर ग्राहाकासमोर चाचणी करून त्याचा अहवाल पुढील सुनावणीच्या वेळी मंचात दाखल करण्याचे सांगण्यात आले. व पुढील सुनावणी ०८/०७/२००८ रोजी ठेवण्यात आली.

५) दिनांक २४/०६/२००८ रोजी ग्राहक व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी ग्राहाकाच्या मिटरचा चाचणी अहवाल उपलब्ध झाला नसल्याचे सांगत सूनावणीची तारीख पुढे वाढविण्याची विनंती केली. अर्जदाराने यावेळी ते मिटर चाचणीसाठी चाचणी विभागात गेले असता ते मीटर चाचणीसाठी त्यांचेकडे पाठविण्यात आले नसल्याचे सांगत मीटर ची चाचणी करण्यात आली नसल्याचे म्हटले आहे. मंचाने नोडल अधिकारी यांना दिनांक ०८/०७/२००८ रोजी मंचासमोर सदरिल मीटर उपलब्ध करून देण्याबाबत तसेच ग्राहकाचे वीज वापराचे बिल स्विकारून याचा वीज पुरवठा खंडित न करण्याचे आदेश दिले.

६) दिनांक ०८/०७/२००८ रोजी श्री आय. जी. बोराडे सहाय्यक अभियंता यांनी सुनावणी तारीख नोडल अधिकारी नसल्यामुळे पुढे वाढविण्याची विनंती केली. त्यानुसार मंचाने पुढील तारीख १५/०७/२००८अशी ठेवली.

७) दिनांक १५/०७/२००८ रोजी ग्राहक व नोडल अधिकारी ऊपस्थित होते. अर्जदाराचे जुने मीटर निकामी करून स्टोअर मध्ये जमा करण्यात आल्याचे सांगत मीटर जमा करतांना त्यावरील रिडींगची नोंद असलेली कागदपत्रे त्यांनी मंचात दाखल केली.

दोन्ही बाजुकडुन दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रावरून मंचास असे आढळुन येते की, अर्जदाराने वीज पुरवठा हा मगंल कार्यालयासाठी घेतला आहे. अर्जदाराचे जुने मिटर (क्रमांक २१०४०६३) हे २३/०५/२००७ रोजी बदलण्यात आले. नवीन लावलेले मीटर (क्रमांक ४११०८६२०) हे २१/०९/२००७ रोजी बदलण्यात आले व त्याजागी ७३३३९७५ क्रमांकाचे मीटर लावण्यात आले. या मीटरचे डिसेंबर २००७ ते फेब्रवारी २००८ काळातील वीज बिल हे १३३६ युनिटचे सरासरीवर आधारीत आकारण्यात आले असल्याचे आढळून येते. अर्जदाराने दाखल केलेली तक्रार याच बिलाबाबत असून नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या सुधारीत वीज बिलात रूपये २४६७५/- क्रडीट देण्याबाबत सांगितले जे योग्य असल्याचे मंचाचे मत आहे. अर्जदाराचे मीटर निकामी करून स्टोअरला जमा करण्यात आल्याचे नोडल अधिकारी यांनी म्हटले आहे पण ते जमा करतांना त्यावरील नोंदीचे कागदपत्रे त्यांनी मंचात दाखल केली असून ते तपासुन पाहता अर्जदारास देण्यात आलेले सुधारीत वीज बिल योग्य असल्याचे मंचाच्या निदर्शनास येते.

अर्जदाराने मीटरच्या बाबतीत तक्रार केल्यानंतर त्याचे बदलण्यात आलेले व सुस्थीतीत असलेले मीटर निकामी करण्यात येवुन ते स्टोअरला जमा करण्यात आल्यामुळे मीटरवरील नोंदीबाबत अर्जदाराच्या मनात सशंय निर्माण झाला असल्याचे आढळुन येते. महावितरण कंपनीने याबाबत योग्य ती उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मंचाचे मत आहे. त्याचप्रमाणे सुस्थीतीत असलेले वीज मीटर हे निकामी केल्यामुळे होणा-या वीत्तहानीबाबत पुर्नविचार करणे जरूरी आहे.

मंच याप्रकरणात खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) अर्जदारास डिसेंबर २००७ ते फेब्रुवारी २००८या काळातील वीज बिल दुरूस्त करून ३० दिवसात सुधारीत बिल देण्यात यावे.
२) शुधारीत वीज बिलात व्याज व दंड आकारू नये.

महावितरण कंपनीने व ग्राहकाने आदेशाचे पालन करावे व तसे मंचास कळावावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **विजय गो. जोशी** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१०६/२००८/२७** **दिनांक ;-**

**प्रति,**

**१) कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद.**

**२) श्री काझी अहेमद मोईनुद्दिन**
**घर नंबर ०१/१५/३६, बुढ्ढिलाईन,**
**औरंगाबाद.**

**विषय ;-** क्र.सिजीआरएफ/एझेड/अेयुआर/यु/१०६/२००८/२७
गा-हाण्याचा आदेश.

वरिल विषयातील गा-हाण्याचा आदेश या पत्रा सोबत जोडला आहे.

ग्राहकास, जर आदेश मान्य नसेल तर तो विद्युत लोकपाल ( खाली दिलेला पत्ता ) यांच्याकडे आपले गा-हाणे आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आंत दाखल करु शकता.

सोबत ;- वरिल प्रमाणे.

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा ईमारत,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**